महाराष्ट्र शासन
# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१-२२/ 3636 दिनांक:- 23 DEC 2021

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- महाडिबीटी पोर्टलव्दारे **शैक्षणिक वर्ष २०२१-२२** करिता विद्यार्थ्याचे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याबाबत.

संदर्भ :- मा. संचालक, तंशिसं, म.रा.मुंबई , यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१८/तंशिसं /डीबीटी/ विकाप /२०२१-२२ / ४८९/ दि. २० /१२ /२०२१

आपले सरकार महाडिबीटी पोर्टल (संकेतस्थळ : https://mahadbtmahait.gov.in) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

1) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
2) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
3) उच्च व्यावसायिक व इयत्ता 12 वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता, महाडिबीटी पोर्टलव्दारे पात्र विद्यार्थ्याचे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली असून विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. ३१/०१/२०२२ पर्यंत देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यांत येते की , आपल्या संस्थेतील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना उपरोक्त योजनाअंतर्गत लाभ घेण्याकरिता आपल्या स्तरावरुन सुचना देण्यात यावे. तसेच आपल्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेल्या अर्जाची अटी व शर्तीनूसार तपासणी करून पात्र असलेले विद्यार्थ्यांचे अर्ज दि. ३१/०१/२०२२ पर्यंत मंजूरीस्तव पाठविण्यात यावे.

**तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या, ज्या विद्यार्थ्याचे अर्ज Send Back व Institute Pending अंतर्गत आहेत, अशा विद्यार्थ्यांना दि. ३१/०१/२०२२ पर्यंत Re-apply करावयाची मुदत देण्यात आलेली आहे. पात्र विद्यार्थ्याचे अर्ज प्रलंबित न ठेवता वेळेमुदतीत निकाली काढावेत. वेळेमुदती नंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहीले तर यांची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.**

(डॉ. मनोज भा. डायगव्हाने)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर